**<u>ठळक बातम्या</u>**

- केवळ आधार कार्डाच्या आधारे दिलेले किंवा संशयास्पद वाटणारे जन्म-मृत्यूचे दाखले आणि नोंदी तत्काळ रद्द करण्याचे महसूल विभागाचे आदेश

- ५ जिल्ह्यांमधली ७५ गावं, स्मार्ट आणि इंटलिजंट व्हिलेजेस म्हणून राज्य सरकार विकसित करणार

- मुंबईत हवेची गुणवत्ता बिघडण्यामागे इथियोपियातल्या ज्वालामुखीचं कारण देता येणार नाही, असं मुंबई उच्च न्यायालयाचं निरीक्षण

**आणि**

- शेअर बाजाराच्या दोन्ही निर्देशांकांचा उच्चांकी पातळीला स्पर्श, दिवसअखेर उच्चांकी पातळी टिकवण्यात मात्र अपयश

**<><><><><><>**

केवळ आधार कार्डाच्या आधारे दिलेले किंवा संशयास्पद वाटणारे जन्म-मृत्यूचे दाखले आणि नोंदी तत्काळ रद्द करा, तसंच याप्रकरणी पोलिस तक्रारी दाखल करण्याचे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल प्रशासनाला दिले आहेत. यासंदर्भातलं परिपत्रक महसूल विभागानं आज जारी केलं. अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून..

***व्हाइस कास्ट***

*(अमरावती, सिल्लोड, अकोला, छत्रपती संभाजीनगर शहर, लातूर, अंजनगाव सुर्जी, अचलपूर, पुसद, परभणी, बीड, गेवराई, जालना, अर्धापूर आणि परळी या ठिकाणी या मोहिमेवर अधिक भर दिला जाणार आहे. १६ मुद्द्यांच्या आधारे या दाखल्यांची तपासणी केली जाईल. यासाठी विशेष मेळाव्यांचं आयोजन करून प्रकरणं निकाली काढली जातील. ज्या प्रकरणांमध्ये केवळ आधार कार्डला पुरावा मानून जन्म मृत्यू दाखले दिले गेले आहेत, ते आदेश त्रुटीपूर्ण मानले जातील. अर्जातली माहिती आणि आधार कार्डवरील जन्मतारीख यामध्ये तफावत आढळली तर संबंधित व्यक्तीवर गुन्हा दाखल केला जाईल. जे लाभार्थी मूळ प्रमाणपत्र परत करणार नाहीत किंवा जे आता सापडत नाहीत, त्यांची यादी*

*बनवून त्यांना 'फरार' घोषित करा आणि FIR दाखल करा असंही या परिपत्रकात म्हटलं आहे. ११ ऑगस्ट २०२३ च्या सुधारणेनंतर नायब तहसीलदारांनी वितरीत केलेले जन्म-मृत्यू नोंदीचे आदेश परत घेण्याचे आणि रद्द करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.)*

**<><><><><><>**

राज्यातल्या ५ जिल्ह्यांमधली ७५ गावं, स्मार्ट आणि इंटलिजंट व्हिलेजेस म्हणून राज्य सरकार विकसित करणार आहे. नागपूरमधल्या काटोल तालुक्यातली १०, अमरावतीमधल्या चांदूरबाजारमधली २३, हिंगोलीतल्या कळमनुरीतली ११, बारामतीमधली १० आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या वैभववाडी तालुक्यातल्या २१ गावांचा यात समावेश आहे. यासंदर्भातला शासन आदेश आज सरकारनं जारी केला. नागपूरमधल्या सातनवरीमध्ये प्रायोगिक तत्त्वावर या प्रकल्प राबवण्यात आला. याअंतर्गत शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, नवीकरणीय ऊर्जा, ई-शासन, डिजिटल संपर्क क्षेत्रातले विविध प्रकल्प राबवले जातात. शहरं आणि गावं यातलं अंतर कमी करणं, ग्रामीण भागातलं जीवनमान उंचावणं हा या प्रकल्पाचा उद्देश आहे. यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सरकारनं समिती स्थापन केली आहे.

**<><><><><><>**

महाराष्ट्रात यंदा जून ते सप्टेंबर महिन्यात झालेली अतिवृष्टी आणि पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर पुढच्या एक वर्षासाठी शेतीशी निगडीत कर्जाची वसुली स्थगिती करायचा निर्णय राज्य सरकारने काल घेतला. तसंच यामुळं बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या अल्पमुदत कर्जाचं रूपांतरण मध्यम मुदत कर्जात करायचे आदेश दिले.

**<><><><><><>**

धाराशिव नगरपरिषदेतल्या तीन प्रभागांची निवडणूक स्थगित करण्यात आली आहे. धाराशिव नगरपरिषदेतल्या प्रभाग २ अ, ७ ब आणि १४ ब या प्रभागांमधल्या

काही उमेदवारांच्या अर्जावरचे आक्षेप न्यायालयात प्रलंबित असल्यामुळं या प्रभागांची निवडणूक पुढच्या आदेशापर्यंत स्थगित करण्यात आल्याचं धाराशिवचे उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

राज्यात येत्या २ वर्षांत एक कोटी लखपती दीदी बनवण्याचं ध्येय सरकारनं ठेवलं आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या प्रचारार्थ आज त्यांनी लातूर आणि हिंगोली जिल्ह्यात प्रचारसभा घेतल्या, त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कधीही बंद होणार नाही, असा पुनरुच्चारही त्यांनी केला. महात्मा फुले जन आरोग्य योजनेत आता २ हजार ४०० आजारांचा समावेश असून काही गंभीर आजारांवर पाच लाखांपेक्षा जास्त खर्चही राज्य सरकार करणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><><>**

महायुतीतल्या तिन्ही पक्षांमध्ये निधी देण्यावरून चढाओढ लागली आहे, असा आरोप ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज केला. बारामती इथं ते वार्ताहरांशी बोलत होते. हल्ली कामावर मतं मागितली जात नाहीत, तर पैसे देऊ, निधी देऊ अशी आश्वासनं दिली जातात. ही चांगली गोष्ट नाही. अर्थकारण आणून निवडणुका जिंकायच्या, हाच दृष्टिकोन असेल, तर त्यावर भाष्य न केलेलं बरं, असं पवार म्हणाले. राज्य सरकारनं कर्जवसुलीला एका वर्षाची स्थगिती देण्याचा निर्णय तात्पुरता उपयोगी ठरेल, पण शेतकऱ्यांचं झालेलं आर्थिक नुकसान पाहता त्यातली काही रक्कम सरकारनं द्यायला हवी होती, असं मतही पवार यांनी मांडलं.

**<><><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांची त्यांच्या मुंबईतल्या

निवासस्थानी भेट घेतली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकीतल्या जागावाटपाबाबत दोन्ही नेत्यांमधे चर्चा झाल्याचं सांगितलं जात आहे. मतदारयाद्यांमधल्या त्रुटी तसंच मनसेचा समावेश महाविकास आघाडीत करण्याबाबत काँग्रेसच्या विरोधी भूमिकेबाबतही दोघांनी चर्चा केली. बृहन्मुंबई महानगरपालिका, नाशिक आणि पुणे महानगरपालिकेसाठी दोन्ही पक्षांची आघाडी महत्त्वाची मानली जात आहे.

**<><><><><><>**

इथियोपियातल्या ज्वालामुखीचा उद्रेक झाल्यामुळे मुंबई शहरात हवेची गुणवत्ता बिघडली, असं कारण देता येणार नाही, कारण त्याआधीपासूनच मुंबईत हवेचा दर्जा खालावलेला होता, असं निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयानं आज नोंदवलं. मुंबईतल्या प्रदूषणाबद्दल २०२३पासूनच्या याचिकांवर सुनावणी घ्यायची विनंती मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या पीठाला आज वकिलांनी केली. सुनावणीदरम्यान, ही परिस्थिती सुधारण्यासाठी काय करता येईल, असं पीठानं विचारलं. या प्रकरणाची पुढची सुनावणी उद्या होणार आहे.

दरम्यान वायू प्रदुषणाला कारणीभूत असलेल्या ५३ बांधकामांना मुंबई महापालिकेनं काम थांबवण्याचे आदेश दिले आहेत.

**<><><><><><>**

यंदाच्या ऊस गाळप हंगामात ३५० लाख मेट्रिक टन साखरेचं उत्पादन होण्याचा अंदाज आहे. साखरेचा आरंभीचा शिलकी साठा ५० लाख मेट्रिक टन असून देशांतर्गत साखरेचा खप २९० लाख मेट्रिक टन आहे. तर ३५ लाख मेट्रिक टन साखर इथेनॉल तयार करण्यासाठी वापरली जाईल. तरीसुद्धा ७५ लाख मेट्रिक टन साखर शिल्लक राहण्याचा अंदाज राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाकडून वर्तवण्यात आला आहे. राज्यांतर्गत उत्पादनात यंदा महाराष्ट्रात

१२५ लाख मेट्रिक टन, उत्तरप्रदेशात ११० लाख मेट्रिक टन आणि कर्नाटकात ७० लाख मेट्रिक टन इतकं सर्वाधिक उत्पादन अपेक्षित आहे.

**<><><><><><>**

देशातल्या शेअर बाजारांनी आज विक्रमी पातळीला स्पर्श केला मात्र त्यानंतर नफेखोरी झाल्यानं दोन्ही निर्देशांक घसरले. सकाळी व्यवहार सुरू झाले तेव्हापासूनच बाजारात तेजी होती. व्यवहाराच्या दरम्यान सेन्सेक्सनं ४४६ अंकांची तेजी नोंदवून ८६ हजार ५६ च्या विक्रमी पातळीला स्पर्श केला होता. निफ्टीनं १०५ अंकांच्या वाढीसह २६ हजार ३१० अंकांची विक्रमी पातळी गाठली होती. त्यानंतर नफा वसुली सुरू झाल्यानं दोन्ही निर्देशांकात घसरण दिसून आली. दिवसअखेरच्या चढउतारानंतर मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स अखेर १११ अंकांची वाढ नोंदवत ८५ हजार ७२१ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १० अंकांची वाढ नोंदवून २६ हजार २१५ अंकांवर स्थिरावला.

**<><><><><><>**

बदलापूर ते कर्जत दरम्यानच्या रेल्वेमार्गिकेवर तिसरी आणि चौथी लाइन टाकल्यानं लोकलच्या १५ लाख प्रवाशांना फायदा होईल, अशी माहिती मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी स्वप्नील नीला यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत दिली. यामुळं मालवाहतूक खर्चातही मोठ्या प्रमाणात बचत होणार असल्याचं ते म्हणाले. केंद्रीय मंत्रीमंडळानं काल या प्रकल्पाला मंजुरी दिली होती. पनवेल-कर्जत दरम्यान अतिरिक्त मार्गिका टाकण्याचं काम येत्या मार्चपर्यंत पूर्ण होईल, असंही नीला यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

शालेय अभ्यासक्रमात तीन भाषांचा समावेश कधी व्हावा हे ठरवण्यासाठी स्थापन झालेल्या त्रिभाषा समितीचे सदस्य उद्या नागरिकांशी संवाद साधणार आहेत. मुंबईत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान इथं सकाळी साडे नऊ ते दुपारी दीड

वाजेपर्यंत होणाऱ्या कार्यक्रमात, तसंच दुपारी तीन ते पाच वाजेपर्यंत ऑनलाईन कार्यक्रमात नागरिकांना सहभागी होता येईल. यात नागरिक, शिक्षण तज्ञ, राजकीय नेते यांनी आपले विचार मांडावेत असं आवाहन त्रिभाषा समितीने केलं आहे. यासाठी समितीने एक प्रश्नावलीही तयार केली असून ही प्रश्नावली **tribhashasamiti.mahait.org** या लिंकवर उपलब्ध असेल.

**<><><><><><>**

गेल्या चोवीस तासात उत्तर कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात किमान तापमानात सरासरीपेक्षा किंचित वाढ झाली. तर उर्वरित राज्यात किमान तापमान सरासरीच्या जवळपास होतं. पुढचे काही दिवस राज्यातल्या सर्व विभागांमध्ये तापमान कोरडं राहण्याची शक्यता आहे.

**//<><><><><><>//**